## संक्षिप्त संपरीक्षा

१. खटल्याचा क्रमांक — १९३९/२०१८ २. गुन्ह्याचा दिनांक — ०७/०७/२०१८.

३. दाखल दिनांक — ०७/०७/२०१८ ४. तक्रारदाराचे नांव — संतोष गायकवाड, रेसुब, कुर्डुवाडी.

५. आरोपीचे नांव — पप्पू कुमार, वय — २० वर्षे, रा. शंभूपूर, ता. तरवारा, जि. शिवान.

६. गुन्ह्याचा तपशिल — तुम्ही दिनांक ०७/०७/२०१८ रोजी पहाटे ६.०७ वाजता गाडी क्रमांक ११०४२ मधील विकलांग बोगीमधून प्रवास करीत असताना आढळून आला आणि तुम्ही भारतीय रेल्वे कायदा कलम १५५ अन्वये अपराध केलेला आहे.

**आरोपीचे निवेदन :—**

प्र. १. : तुम्हाला केसच्या नकला मिळाल्या काय ?
उत्तर : होय
प्र. २. : तुम्हाला आता गुन्हा समजावून व वाचून दाखविला तो समजला काय ?
उत्तर : होय
प्र. ३. : तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय ?
उत्तर : होय
प्र. ४. : तुम्हाला सरकारी खर्चाने वकील पाहिजे काय ?
उत्तर : नाही

..............................

आरोपीची सही

दि. ०७/०७/२०१८

**प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड**

## आदेश

आरोपीने, स्वेच्छेने गुन्हा कबुल केलेला आहे. त्यांनी प्रार्थना केली आहे की, तो गरीब असल्यामुळे कमीतकमी शिक्षा करण्यात यावी. सदरील आरोपीने, पूर्वी कोणताही गुन्हा केल्याचे फिर्यादी पक्षाने सिध्द केलेले नाही. आरोपीने सांगितले आहे की, हा त्याचा पहिला गुन्हा आहे. सदरील केसमधील कागदपत्र त्याने पूर्वी गुन्हा केलेला आहे असे सिध्द करीत नाही. तसेच गुन्हयाचे स्वरुप किरकोळ आहे. त्यामुळे वरील सर्व बाबींचा विचार करुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

०१. आरोपीस फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २५२ नुसार भारतीय रेल्वे कायदा कलम १५५ अन्वये दोषी ठरवुन कोर्ट उठेपर्यंत शिक्षा आणि रुपये ५,००/— दंड करणेत येत आहे. दंड भरणेस कसूर केल्यास पुढे आणखी २ दिवसांची शिक्षा ठोठावण्यात येते.

दि. ०७/०७/२०१८

**प्रथमश्रेणी न्यायदंडाधिकारी**
**लोहमार्ग न्यायालय, दौंड.**